दिपोत्सव २०२४
सामाहिक
बेरार टाईम्स
वर्ष-१३ | गोंदिया | आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | शुक्रवार,दि.१ नोव्हेंबर २०२४ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# दिवाळी बळीराजा-बळीप्रजेची, कास्तकार-कष्टकऱ्यांची

इडा पिडा जावो।
बळीचे राज्य येवो।।

बळीच्या काळी कोणी उच्च नव्हते. कुणी नीच नव्हते. तिथे ब्राह्मण नावाची जातच नव्हती.आधीचा बळीभारत हा आर्यरहित भारत होता. आर्यभट वखवखलेल्या भुकेल्या अवस्थेत तिथे आले. ते वखवखलेले होते. तसेच क्रूर नि आक्रमक होते. त्यांनी सिंधू भारतातील लोकांशी युद्धे केलीत. कपट केले.

सरळ वार करत नव्हते. म्हणून नाना सोंगे ढोंगे केलीत. आणि इथल्या बहुजनांचे सिंधुजनांचे मानवतावादी–समता–वादी आचार विचार नष्ट करून ती संस्कृती नष्ट केली. सारा विध्वंस माजवला. अराजक स्थिती निर्माण केली.

बहुजन संस्कृती–बहुजन बळीराष्ट्र नष्ट केले. ती व्यवस्था मोडतोड केली.आणि आपली कट्टर विषमतावादी संस्कृती लादली.

बळीचा पाडाव सिंधू संस्कृतीतील राजाचा पाडाव होता. त्या संस्कृतीचा विनाश होता. बळीच्या काळात या देशात खऱ्या अर्थाने सोन्याचा धूर निघत होता. खऱ्या अर्थाने समता समृद्धी होती.

आता आपण बळीची याद कशासाठी ठेवायची? त्याच्या राज्याची याद कशासाठी करायची. निव्वळ बळीची याद केल्याने बळीसंस्कृती–बळीराष्ट्र निर्माण होईल का? बिल्कुल नाही! त्यासाठी इथल्या तमाम बहुजनांना जागे व्हावे लागेल. आपले सिंधुराष्ट्र–बळीराष्ट्र पुन्हा उभे करावे लागेल. पराक्रमी व्हावे लागेल.

वामन नावाच्या कुलट्याने बळीचा खून केला त्याला पाताळात गाडले. बळी असूर होता. राक्षस होता म्हणून वामनाच्या रूपाने ब्राह्मण वामनाने त्याचा खून केला असा प्रचार वामन लोक आपल्या पोथ्या, पुराणातून सतत करतात. परंतु बळी हा ब्राह्मणांचा शत्रू होता. तो समतेचा रक्षक होता. तो बहुजनांचा रक्षक होता.

स्त्री–पुरुष समतेचा सखा होता. या देशातील ज्या ज्या लोकांना ब्राह्मण वाईट म्हणतात, राक्षस म्हणतात, ते सर्व बहुजनांचे रक्षक होते. सिंधू संस्कृतीचे रक्षक होते. म्हणून पोथ्या पुराणे वाचून, भटी कीर्तने ऐकून, प्रवचन ऐकून, बह्मकू नका. कारण या सर्व प्रकारांचे कर्तेधर्ते ब्राह्मण असतात. ते तुम्हाला तुमच्यातल्याच भल्यांना वाईट दुष्ट ठरवतच नाहीत तर तुमच्या मनात त्यांच्याविषयी द्वेष निर्माण करतात. वाईट भावना निर्माण करतात. आजकालचे वामन कास्तकारांना बळीराजा म्हणतात. कारण शेतकरी हे खऱ्या अर्थाने बळीराजाचे वंशज आहेत.

बळीप्रमाणे संपूर्ण कास्तकार कष्टकरी त्यांनी पाताळात म्हणजे जमिनीत गाडले आहेत. कष्ट करूनही त्याला गरिबीत, दुःखात लोटले आहेत. आणि जे जे वामन वंशज आहे, ते मात्र ऐष आरामात आहेत. कष्ट न करताही श्रीमंत आहेत. बळीच्या राज्यात सिंधूकाळात या उलट स्थिती होती. कष्टकरी कास्तकार उत्पादक यांचा वरचष्मा होता. ते दर्जाने उत्तम होते. ते आयतोबा नव्हते. त्यांना प्रतिष्ठा होती. मान होता. बळी संस्कृती अशी आजच्यापेक्षा उलटी होती. तिला पुन्हा प्रतिष्ठित करायला पाहिजे. पुन्हा कष्टकऱ्यांना सुखी जीवन मान मरातब मिळायला पाहिजे.आरामात कष्ट न करता जगणाऱ्यांचे स्थान खाली व्हायला पाहिजे. त्यांची सामाजिक पत कमी करायला पाहिजे.

हे तेव्हाच होईल जेव्हा इथला बळीराजा–बळीप्रजा उठाव करेल. आपली संस्कृती पुन्हा उभारेल. ब्राह्मणीमूल्य ब्राह्मणीसंस्कृती फेकून देईल. आज वर्चस्व, दहशतवाद आणि विषमतावादी बिनकष्टी ब्राह्मण जातीची आहे. कारण त्यांनी आपली मती मारून टाकली आहे. सर्व शिक्षण त्यांनी आपल्या हातात घेतले आहे. समाज, अर्थ, शिक्षण नीती आचार–विचार हे आता आम्ही उभारले पाहिजे. प्रतिष्ठित त्यांना करूया जे धनधान्य निर्माते आहेत. या भूमीचे मूळ मालक आहेत. सर्व बहुजन बाया–माणसे.

आजही आम्ही ब्राह्मणी संस्कृतीत जगतो आहोत. त्यांच्या भाषेला, त्यांच्या संस्कृतीला त्यांनी लादलेल्या देवदेवतांना, मग त्या कितीही विकृतीपूर्ण असोत, अनेक हात तोंड असलेल्या देव्या असोत, त्यांचे पुजारी झालो आहोत. हे सर्व टाकायला पाहिजे.

बळी राज्याची संस्कृती वैज्ञानिक संस्कृती होती. ती पुन्हा उभारली पाहिजे. केवळ इच्छा केल्याने, आस धरल्याने, वा इडा पिडा टळो म्हटल्याने विषमतेची पीडा टळणार नाही. त्यासाठी या देशातील बळी वंशियांनी, नाग, द्रविड वंशियांनी बळी संस्कृतीसाठी कसून प्रयत्न केले पाहिजे. वैयक्तिक भल्याचा विचार फेकून व्यापक समाजाचा




विचार केला पाहिजे. त्यासाठी सर्व साधनांनी प्रचार केला पाहिजे. वामनी विषमतेवर विजय मिळवला पाहिजे. हा विजय ज्या दिवशी उगवेल, तेव्हाच बळीचे राज्य आले असे म्हणता येईल. सर्व बहुजनांनी यासाठी सिद्ध व्हावे. तेव्हा सर्वांना, बायामाणसांना प्रोत्साहित करा, सामील करा, स्वतःचे हे ध्येय स्वीकारा, इतरांत पेरा, बळीराज्य नक्कीच येईल.

**– नागेश चौधरी**
**नागपूर**















## संपादकीय

# दीपपर्व ;आनंदाची पर्वणी

भारतासह विदेशातही दिवाळीचा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. गरीब श्रीमंत असा भेदभाव न करता सर्वजण आपापल्या परीने दिवाळी पर्वाचा आनंद लुटतात. हिंदुसंस्कृतीतील सर्वांत मोठा सण म्हणूनही दीपोत्सवाला महत्त्व आहे. प्रत्येकाच्या अंगणात तिमिराला घालवून प्रकाशकिरणे पसरविणारा हा सण. अंधाराकडून उजेडाकडे नेणारी ही दिवाळी प्रत्येकाच्या मनात घरात मांगल्य घडविणारी असते. अशा या दिवाळीनिमित्त सर्वांना मनापासून हार्दिक शुभेच्छा.

देशभर दिवाळी साजरी करण्याच्या वेगवेगळ्या प्रथा–तऱ्हा आहेत. धनत्रयोदशीपासून सुरू होणारी दिवाळी नरकचतुर्थीच्या दिवशी आपल्यातील नरकरुपी पाप, अहंकाराचे उच्चाटन केले जाते. लक्ष्मीपुजनासोबतच ग्रामीण भागातील महत्त्वाचा दिवस म्हणजे बलीप्रतिपदेचा. शेतकरी आपल्या राजा बळीराजाची पूजा अर्चना मोठ्या भक्तिभावाने करतात. अशा या मांगल्याचे प्रतीक असलेल्या दिवाळीच्या निमित्ताने माणसातील प्रकाशतत्वाचे प्रफुल्ल प्रक्षेपण अनुभवता येते. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीने देखील या सणाचे माहात्म्य आहे.

दिव्यांचे वैविध्यपूर्ण आणि कलात्मक प्रकार आहेत. त्यांचे सांस्कृतिक स्थान मात्र अनन्यसाधारण आहे. ज्योती अनेक पण प्रकाशतत्व एकच. शरीर म्हणजे पणती व त्यातील ज्योत म्हणजे प्राण, असे थोर संत सांगून गेले.

संतांच्या दृष्टिकोनातून स्वतःला अंतर्मुख करून टाकणारे हे प्रकाशपर्व आहे. हे प्रकाशपर्व शेतकरी, कष्टकरी, गरीब, श्रीमंत सर्वांच्या अंगणात आले आहे. प्रत्येक जण आपल्या लायकीप्रमाणे हा सण साजरा करीत असतो. पण या सणात दरवळणारा सुगंधतत्व मात्र एकच आहे.

पूर्व विदर्भातील जिल्हे धानपिकाचे.

सध्या कापणीचा हंगाम सुरू असला निसर्गाने मात्र आपला कोप दाखविण्यास सुरवात करीत आहे. यामुळे या दिवाळीला हातात आलेले पीक मात्र अडचणीत सापडण्याची भिती निर्माण झाली आहे. तरी निसर्गापुढे काही चालत नाही. या नियतीला सामोरे जाऊन आपल्या परीने तो प्रकाशपर्व साजरा करण्यासाठी अंधारातून दिव्यांच्या उजेडात प्रकाशपर्वाच्या स्वागतासाठी प्रत्येक जण मात्र सज्ञ झाला आहे. दीन दुबळ्यांसह सर्वांची दिवाळी दीपोत्सवाच्या उजेडाने न्हाऊन निघावी हीच अपेक्षा.

१३ वर्षापासून जनतेच्या वाचकांच्या सेवेत पुर्व विदर्भात जिल्ह्यात हिंदी भाषिकांची मोठी संख्या असतांनाही मराठीची अस्मिता टिकवून ठेवत निर्भिड, जनसामान्यांचे व्यासपीठ म्हणून बेरार टाईम्सने आपली जागा कायम केली आहे.

वाचक, जाहिरादार व वितरक तसेच हितचिंतकांच्या प्रेमापोटी दिपोत्सव विषेशांक २०२४ साकारु शकलो आहे. या दिपोत्सवाच्या निमित्ताने जिल्ह्यातील बेरार टाईम्सचे हिं–तचिंतक, वाचक जाहिरातदार, प्रतिनिधी वितरक व जनतेला दिवाळीच्या

हार्दिक शुभेच्छा.

बळीराजा बळ दे..
गौतम बुद्धा, बुद्धी दे..
जिजाऊ माते प्रेरणा दे..
शिवराया युक्ती दे..
तुकोबाराया ज्ञान दे..
शंभूराजा शक्ती दे..
उमाजीराजा शौर्य दे..
ज्योतिबा त्यागाची भावना दे..
सावित्रीमाई संयम दे..
भीमराया शिक्षणाची आस दे..
शाहूराजा तळमळ दे..
अण्णा भाऊ लेखणी दे..
अहिल्यामाई जनसेवेची इच्छा दे..इडा–पीडा टळू दे, बळीचे राज्य येवू दे..

खेमेंद्र कटरे–मुख्य संपादक

# धान,तांदूळ,भात आणि आमचा न्यूनगंड

पूर्व विदर्भातील म्हणजेच झाडीपट्टीतील मबद्मा बद्माफ जाण–तो की, धान, तांदूळ व भात या धानपीकाच्या तीन वेगवेगळ्या ङ्गअवस्थाङ्ग आहेत. धान म्हणजे तांदूळ किंवा भात नव्हे, तांदूळ म्हणजे धान किंवा भात नव्हे आणि भात म्हणजे धान किंवा तांदूळ नव्हे.

धानावर प्रक्रिया (भरडाईची प्रक्रिया) केल्यावर तांदूळ मिळतो आणि तांदूळावर प्रक्रिया (शिजवण्याची प्रक्रिया) केल्यावर भात मिळतो. यासंदर्भात उदाहरणच द्यायचे झाले तर बर्फ, पाणी आणि वाफेचे उदाहरण देणे सयुक्तिक राहील. बर्फावर प्रक्रिया (उष्णतेची प्रक्रिया) केल्यावर पाणी आणि पाण्यावर प्रक्रिया (उष्णतेच–ीच प्रक्रिया) केल्यावर वाफ मिळते. आणि कोणीही बर्फाला आणि पाण्याला वाफ म्हणत/संबोधत नाहीत. पण धानाला मात्र सर्रास भात म्हटले/संबोधले जाते.

बर्फाला वाफ म्हणणे वैचारिक, वैज्ञानिक, वैधानिक आणि व्याकरणिक दृष्ट्या योग्य नसेल तर धानाला भात म्हणणे सुद्धा वैचारिक, वैज्ञानिक, वैधानिक आणि व्याकरणिक दृष्ट्या योग्य कसे म्हणता येईल?

असे असले तरी आणि आमच्या पूर्व विदर्भात/झाडीपट्टीत धानाला धानच म्हटले/संबोधले जात असले तरी पुणे–मुंबई येथील तथाकथित साहेब(!) लोकांनी आम्हा झाडीपट्टीवासीयांना धानालाच भात म्हणायला ला–वून झाडीपट्टीतील गावागावात स्थापित झालेल्या सहकारी धान गिरण्यांना धान गिरणी म्हणण्या/संबोधण्याऐवजी सहकारी भात गिरण्या म्हणायला/संबोधायला/लिहायला बाध्य केले आणि आम्ही पूर्व विदर्भातील/झाडीपट्टीतील लोक त्याला कोणताही, जरासाही विरोध न करता बळी पडलो, अशी वस्तुस्थिती दिसून येते. शिवाय अजूनही पुष्कळदा धानाला धान म्हणण्याऐवजी तांदूळ किंवा भात असेच म्हटले/संबोधले जाण्याचे शासकीय व वर्तमानपत्रीय तथा समाज माध्यमीय सुद्धा प्रयत्न रोजच आढळून येत असतात. (यात हळूहळू का होईना सकारात्मक सुधार होत आहे ही, अल्प का असेना, समाधानाची बाब आहे!)

पौराणिकच नव्हे तर प्रागैतिहासिक काळापासूनच सुप्रसिद्ध व नामचलित असलेल्या या मफ्विदर्भ (प्र)देशाफ्र ची ऐतिहासिक अस्मिता सर्वप्रथम ०१ नोव्हेंबर १९५६ ला तुडविण्यात तत्कालीन राजकीय व्यवस्था सफल झाली आणि आम्ही झाडीपट्टीतील रहिवासी कदाचित तेव्हापासूनच न्यूनगंडांने ग्रसित होऊ लागलो असे प्रथमदर्शनी आढळून येते. त्याच न्यूनगंडाच्या अत्यधिक प्रभावाने प्रभावित(?) होऊन आम्ही झाडीपट्टीतील लोक या धानाला भात म्हणण्या/संबोधण्या/लिहिण्याच्या बाध्यतेला नाहक असा खोळखळंबा स्वीकारून मान्य करून बसलो, असे आज म्हणावे लागेल.

आम्हा झाडीपट्टीतील रहिवाशांच्या न्यूनगंड–शरणतेचे हेच फक्त एकमेव उदाहरण नसून राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक, भौगोलिक, साहित्यिक यासारख्या जवळपास सर्वच क्षेत्रात आजही आमची ही कदाचित ळप–र्लीळश्रीं होऊन बसलेली कमजोरी व न्यूनगंड–शरणता पदोपदी जाणवत असते.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीजवळ चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# इडा पिडा टळों बळीचे राज्य येवों

शेतकरी विरोधी नेत्यांना फटाके लावून बळीराजा महोत्सव साजरा करुया! समतावादी बळीराजा, कपटी वामणाचा पराभव एक दिवस नक्की करेल हा आत्मविश्वास बळीराजा महोत्सव पर्वावर बळीच्या वारसांमध्ये वाढत जावोत, आणि समतेचे बळीराज्य येवो! या समस्त शेतकरी कष्टकरी बहुजन भावंडांना हार्दीक सदीच्छा!

शेतकऱ्यांना दुर्लक्षित करणाऱ्या, अपमानीत करणाऱ्या व्यवस्थेला उलथून टाकण्याचे बळ, समस्त बळी वंशातील भूमिपुत्रांमध्ये येण्याच्या दृष्टीने बळी महोत्सव, दिपावली साजरी झाली पाहिजे. त्यासाठी फटाके फोडून बळीराजा महोत्सवाचा बेगडी आनंद घेण्याच्या ऐवजी, शेतकरी विरोधी, ओबीसी विरोधी, कष्टकरी, कामगार विरोधी, ओबीसींच्या जातीनिहाय जनगणना विरोधी नेत्यांना फटाके लाऊन बळीराजा महोत्सव साजरा करुया!

महात्मा जोतीराव फुले यांनी मशेतकऱ्यांचा असूडफ मध्ये विविध अंगांनी होणाऱ्या शेतकऱ्यांच्या शोषणाची चर्चा केली. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा विविध बाजुने होणारे शोषण समजून घेतले नाही तर, शेतकरी बहुजनांच्या शोषणाविरुद्धचा लढा निर्णायक स्थितीत येत नाही हा आजपर्यंतचा अनुभव आहे. शेतमालाचे भाव वाढीसाठी शेतकऱ्यांना वारंवार आंदोलन करण्यास भाग पाडणे देखील अनैतिक आहे, अन्यायकारक आहे. आज १०००० रुपये क्विंटल कापसाचा भाव परवडेल, परंतु दोन वर्षांनी तो न परवडणारा भाव ठरेल. त्यावेळी पुन्हा शेतकऱ्यांनी आंदोलन करावे का? शेतकऱ्यांना एवढा वेळ असतो का? यासाठी उत्पादन खर्चावर आधारित भाव, महागाई निर्देशांकानुसार भाव किवा इतर आणखी बाबींचा आधार घेऊन स्थायी स्वरुपाचा उपाय केला पाहिजे. त्यासाठी शेतकरी ओबीसी पोरांचा समावेश असलेला कृषी आयोग असला पाहिजे. शासन, प्रशासनात जातिव्यवस्थेत शुद्र ठरविलेल्या शेतकरी पोरांचा संख्या प्रमाणात भरणा असणे म्हणूनच अत्यंत गरजेचे आहे. केवळ आर्थिक मागण्यांचे आंदोलन हे शेतकरी न्यायाचे आंदोलन होत नाही, हे शरद जोशीच्या शेतकरी आंदोलनात आपल्या लक्षात आले. शरद जोशीनी महात्मा फुलेंच्या मशेतकऱ्याचा असूडफया



ग्रंथाची आठवण करून ओबीसींना सोबत घेतले, परंतु त्याच ग्रंथातील प्रशासनात सर्व जातींची त्यांच्या संख्याप्रमाणात नेमणूक करण्याची गरज असल्याचे म. फुले यांचे मत लोकांच्या नजरेस आणले नाही.

शेतकरी हिताचे निर्णय होण्यासाठी ओबीसींच्या प्रतिनिधित्वाचा मुद्दा म.फुले अधोरेखित करतात आणि याउलट ओबीसींच्या प्रशासनात प्रनिधित्वाची तरतुद असलेल्या मंडल आयोगाला शरद जोशी उष्ट्या पत्रावळी म्हणतात. इथेच शेतकरी ओबीसी जातींचा घात केला जातो. म्हणून खऱ्या अर्थाने शेतकरी कष्टकरी हितासाठी लढायचे असेल तर, छत्रपती शाहू महाराज, महात्मा जोतीराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ.पंजाबराव देशमुख, सत्यशोधक प्रबोधनकार ठाकरे, सत्यशोधक नारायण मेघाजी लोखंडे, सत्यशोधक केशवराव जेधे, सत्यशोधक दिनकरराव जवळकर, सत्यशोधक भास्करराव जाधव, सत्यशोधक व्यंकटराव गोडे, सत्यशोधक आनंदस्वामी इत्यादी असंख्य सत्यशोधक पुढाऱ्यांनी घेतलेल्या भूमिका मध्यवती ठेवून वाटचाल करावी लागेल. जातीव्यवस्था, धर्म व्यवस्था ह्या शेतकरी ओबीसी, बहुजन समाजाच्या शोषणाच्या मुख्य व्यवस्था असल्यानेच द्रष्टे महात्मा फुले यांनी ब्राम्हणी आडपडद्यात गुलामगिरी या ग्रंथात धर्माधारीत शोषणाची चिकित्सा केली. स्त्री–शुद्रातिशुद्र कष्टकरी शेतकरी कामगार यांच्या शो–षणाची व्यवस्था असलेला वैदिक धर्म , मनुस्मृतीचा धर्म याचा धिक्कार महात्मा फुले करतात. अंधभक्तांच्या फितुरीमुळे ओबीसी, दलित, आदिवासींचे सामाजिक, आर्थिक न्यायाचे लढे एकत्रीतपणे पुढे जाण्यात अडथळे निर्माण झालेले आहे. याही लोकांना फटाके लावण्याचे काम बळीराजा महोत्सव पर्वावर आपल्याला करावे लागेल.

उठ ओबीसी जागा होती! संघर्षाचा धागा होता!

**बाबा बीडकर**

# “दिवाळी-भारतीय-आनंदोत्सव”

दिवाळी हा सण भारताच्या बहुतांश भागांतून तर साजरा केला जातोच,पण त्याबरोबरच भारतीय लोक जगातील ज्या विविध देशांतून स्थलांतरित झाले आहेत आणि तेथे तात्पुरते वा कायमचे वास्तव्य करीत आहेत, त्या त्या ठिकाणिही तो साजरा केला जातो. हा सण अतिशय लोकप्रिय असा असून तो आपल्या संस्कृतीमधील अनेक घटनांशी संबंधित असल्यामुळे अनेक ङ्गसणांचा एक समुच्चयङ्ग असे त्याचे स्वरूप बणले आहे.

आपल्याकडे ऋतूंची गणना करतांना सहा ऋतू मानण्याची एक पद्धत आहे. प्रत्येक ऋतूचा काळ दोन महिण्यांचा मानला जातो.या गणनेनुसार आश्विन आणि कार्तिक या दोन महिण्यांचा मिळून शरद ऋतू मानला जातो.हा ऋतू सफलतेचे,समृद्धीचे आणि स्वप्नपूतीचे प्रतिक बनला आहे. प्राचीन भार–तात शरद ऋतूपासून नव्या वर्षाची गणना करण्याची पद्धत होती.

या ऋतूमध्ये पावसाळ्याची तीव्रता संपलेली असते.आकाश निरभ्र झालेले असते.नद्यांचे पूर ओसरल्यामुळे त्यांचे पाणी स्वच्छ आणि पारदर्शक बनलेले असते.

महत्वाची गोष्ट म्हणजे खरीपाची बरीच पिके निघा–लेली असतात वा निघण्याच्या बेतात असतात.याचा अर्थ हा वर्षातील पहिल्या सुगीचा आणि परिपक्वतेचा काळ असतो.त्यामुळे समाधानाचे वातावरण पसरलेले असते.स्वाभाविकच,आनंदोत्सव साजरा करण्याच्या दृष्टीने हा काळ अनुकूल असतो. विविध पक्वान्ने, नवे कपडे, दिपांच्या रांगा इ. मार्गांनी लोक हा आनंद व्यक्त करतात.

महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्याला बळीराजा म्हटले जाते.हा शेतांमधील सुगीचा काळ असल्यामुळे या काळात भारतीयांचा प्रेरणापुरुष असलेल्या बळीराजाच्या आठवणी निघणे स्वाभाविक आहे.खरे तर दिवाळीचा हा सण अतिशय कृतज्ञतापूर्वक बळीमहोत्सव साजरा करण्याचा आहे. त्याचे मुळचे स्वरूप बळीराजाला आणि कृषीला केंद्रस्थानी ठेवून निश्चित करण्यात आले आहे. सध्या साजऱ्या केल्या जाणाऱ्या दिवाळीमध्येही कार्तिक शुक्ल प्रतिपदा ही बलीप्रतिप्रदा म्हणून साजरी केली जाते आणि कार्तिक शक्ल द्वितीयेला भाऊबीज साजरी करण्याच्या दिवशी बहिण भावाला ओवाळताना मइडा पिडा टळो आणि बळीच राज्य येवोफ अशी सदिच्छा अंत:करणपूर्वक व्यक्त करते. याचा अर्थ केरळमध्ये ज्याप्रमाणे सुगीचा सण असलेला मओणम्फसाजरा केला जातो,तशेच दिवाळीचेही स्वरुप आहे.

आश्विन कृष्ण द्वादशी हा दिवाळीचा पहिला दिवस होय.या द्वादशीला मगोवत्सद्वादशीफ वा मबसुबारसफ असे म्हणतात. या दिवशी गाय आणि वासरू यांची पुजा करण्याची पद्धत आहे.या काळात ज्याप्रमाणे शेतांमधील धान्य घरी आलेले असते,त्याप्रमाणे दूधदुभतेही विपूल प्रमाणात मिळत असते. कृषीसंस्कृती आणि पशुपालनसंस्कृती यांचा निकटचा संबंध आहे.

स्वाभाविकच, दिवाळीच्या या पहिल्या दिवशी आपल्याला दूधदुभते देणार्या गायीगुरांविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते शिवाय कृष्णाचा गायी आणि वासरे यांच्याशी जो जिव्हाळ्याचा संबंध होता,त्याचे स्मरणही या निमित्ताने केले जाते.

आश्विन कृष्ण त्रयोदशीला मधनत्रयोदशीफ म्हटले जाते. माणसाला आनंदाने उपजीविका चालविण्यासाठी धनाची आवश्यकता असतेच. ते एक अतिशय महत्वाचे साधन आहे. कष्ट करुन योग्य मार्गाने मिळविलेले धन हे मानसाला सुरक्षितता, स्वावलंबन, स्वातंत्र्य आणि आनंद देणारे असते. अशा धनाविषयी कृतज्ञता व्यक्त करणे, हा धनत्रयोदशीचा अभिप्रेत अर्थ आहे. या दिवसाचे एक वेगळे महत्वही आहे. वैदिक परंपरेमध्ये दक्षिण दिशा अशुभ मानण्यात आली आहे. यामागे एक सांस्कृतिक इतिहास आहे. वैदिक लोक आणि त्यांना विरोध करणारे बळी वगैरेंचे अनुयायी यांच्यामध्ये एक दीर्घकाळ संघर्ष चालू होता. बळीचे अनुयायी दक्षिणेकडे सरकले होते.ते यज्ञयागांना विरोध करणारे होते. युद्धे होत, तेव्हा ते दक्षिणेकडून हल्ले करीत असत. वैदिकांना या हल्ल्यांची भिती वाटत असे. म्हणून ते भितीपोटी दक्षिण दिशेला अशुभ मानू लागले होते. दक्षिण दिशेकडे तोंड करून दिवा लावू नये, अशी प्रथा रूढ करण्याइतका दक्षिण दिशेचा धसका त्यांनी घेतलेला होता.

धनत्रयोदशीच्या दिवशी जाणीवपूर्वक दक्षिणेकडे तोंड करून दिवे लावले जातात.याचा अर्थ हा दक्षिण दिशेचा आणि तिकडे राहणाऱ्या अवैदिक लोकांचा गौरव करण्याचा उत्सव ठरतो.

दिवाळीच्या सणामध्ये आश्विन कृष्ण चतुर्दशी ही मनरक चतुर्दशीफ या नावाने प्रसिद्ध आहे.प्राचीन भारतात नरक नावाचे अनेक राजे होऊन गेले आहेत.

त्यांच्यापैकी वैदिक इंद्राचा विरोधक असलेला अतिशय सामर्थशाली, गुणसंपन्न आणि भ्रामक कर्मकांड वगैरेंना नाकारणारा एक महान राजा होऊन गेला आहे.तो राजा इंद्राच्या संस्कृतीपेक्षा पर्यायी अशी एक निकोप संस्कृती जपणारा होता. नरक चतुर्दशी हे नाव या राजाच्या नावावरूनच प्राप्त झाले आहे हे उघड आहे.

या नरक राज्याला कृष्णाने मारले, अशा अर्थाच्या ज्या कथा आढळतात, त्या इतर अनेक कथांप्रमाणे कृष्णाच्या नावावर नंतर घुसडण्यात आल्या आहेत. नरक राजा आपले सामर्थ आणि सद्गुण यांच्या जोरावर आपले इंद्रपद हिरावून घेईल, अशी भिती इंद्राला वाटत होती, याचा अर्थ वैर होते, ते वैदिक इंद्र आणि नरक राजा यांच्यामध्ये. परंतु इतिहास तशा पद्धतीने लिहिण्याऐवजी बहुजननायक असलेल्या कृष्णाने नरक राज्याची हत्या केली, असे खोटेच लिहिण्यात आले, हे उघड आहे.

कृष्णाची लोकप्रियता वापरून बहुजन समाजामध्ये बहुजनांचा नायक असलेल्या नरक राजाविषयी तिरस्कार निर्माण करण्याच्या हेतूने कृष्णाच्या नावाचा वापर करण्यात आला. नरक राजाप्रमाणेच स्वत: कृष्ण इंद्रविरोधक होता,हे ध्यानात घेतले असता, कृष्ण इंद्रासाठी नरक राजाची हत्या करणे शक्य नव्हते.स्वाभाविकच नरक राजा आणि कृष्ण यांच्यातील वैर आणि युद्ध ही एक काल्पनिक गोष्ट ठरते. नरक राजा एक वेगळी संस्कृती चालवत असल्यामुळे त्याची बदनामी करण्यासाठी मनरकफ या



शब्दाचा अर्थ ममृत्यूनंतर यातना भोगण्याचे स्थानफ असा करण्यात आला आणि तो शब्द भाषेमध्ये रूढ करण्यात आला.

नरक राजाचा पराभव वा अंत या दिवशी झाला होता, असे म्हणण्याला वस्तुनिष्ठ असा सबळ पुरावा नाही. तो इंद्रावरील त्याच्या विजयाचा दिवस होता. ज्या अथी त्या दिवसाला त्याचे नाव देण्यात आले आहे, त्या अथी तो दिवस त्याच्या गौरवाचा, महात्म्याचा आणि जयजयकाराचाच आहे,हे उघड आहे. त्या दिवशी कृष्णाने त्याला मारले असते, तर तो दिवस कृष्णाच्या जयजयकाराचा झाला असता आणि त्या दिवसाला नरकाचे नाव देण्याऐवजी कृष्णाचे दिले गेले असते किंवा इंद्राचे दिले गेले असते. या घटनेशी कृष्णाचा सबंध नाही हे तर उघडच आहे.

नरकचतुर्दशीच्या दिवशी नरक राजाची आठवण जागवणे, त्याला आदरांजली अर्पण करणे आणि त्याच्याविषयीची आपली कृतज्ञता व्यक्त करणे, यासाठी दिप प्रज्वलित केले जातात. असा उत्सव साजरा करण्यामागे एक खास धारणा असते.एक वर्षापूर्वी त्या व्यक्तीचे स्मरण करून तिच्याकडून जी प्रेरणा घेतलेली असते, ती वर्षभरामध्ये काळाचा परिणाम म्हणून काहिशी क्षीण झा–लेली असते, म्हणून एक वर्षानंतर पुन्हा त्या प्रेरणेचे नुतनीकरण करणे आणि ती ताजेपणाने आपल्या अंतर्यामी धारण करून पुढच्या वर्षासाठी नव्याने उर्जा संकलित करणे, असा याचा अर्थ असतो. नरक चतुर्दशीच्या निमित्ताने नरक राजाच्या चरित्रातून अशी प्रेरणा घेणे, हे उचित होय. एक प्रकारे त्या दिवशी नरक राजाचे आपल्या जीवनात पुनरागमन होते, म्हणून त्याचे स्वागत करण्याचा दिवस या दृष्टीनेही आपण या दिवसाकडे पाहू शकतो.

आश्विन अमावास्येला लक्ष्मीपुजन केले जाते. लक्ष्मी या शब्दाचे अनेक अर्थ आहेत. या संदर्भात धनसंपदा, वैभव, समृद्धी हा या शब्दाचा अर्थ आहे. धनत्रयोदशीच्या संदर्भात धनाविषयी जे म्हटले,तेच लक्ष्मीपुजनालाही लागू पडते.यामध्ये आणखी काही गोष्टींची भर घालणेही आवश्यक आहे.

लक्ष्मीपुजन हे मुळचे ममनिर्ऋतिपूजनफ होते. निर्ऋती ही सिंधु संस्कृतीच्या काळातील एक अतिशय महान स्त्री होती.आज लक्ष्मी ज्या समृद्धीचे प्रतिक मानली जाते, त्या समृद्धीची खऱ्या अर्थाने निर्मिती करण्याचे महान कार्य प्राचीन काळात बहुजन समाजातील अतिशय श्रेष्ठ अशा निर्ऋती नावाच्या स्त्रीने केले होते.यज्ञयागासारख्या चाकोरीबद्ध कर्मकांडाचा अंगीकार करण्याऐवजी तिने समाजरचनेत सर्व प्रकारच्या नवनिर्मितीच्या संकल्पना कार्यान्वित करण्याचे कार्य केले होते. नवनिर्मितीच्या या कार्यामुळेच तिची पृथ्वीबरोबर तुलना केली जात असे. स्वाभाविकच, मनर्ऋतिफ या शब्द–ाचे मआनंद देणारीफ, मपृथ्वीफ, असेही अर्थ झाले होते.या निर्ऋतीचा बहुजनांची महान पूर्वज जी पार्वती तिच्याशीही निकटचा संबंध होता. नवनिर्मिति,समृद्धी,उज्वल यश आणि आनंद यांचे प्रतीक असलेली ती बहुजनांच्या जीवनाला विधायक दिशा देणारी आहे.भारतीयांच्या आद्यमातांपैकी ती एक आहे.

निर्ऋतीचे आपल्या सांस्कृतिक जीवनातील हे अतिशय उदात्त स्थान पाहता आपण या दिवशी निर्ऋतीच्या गौरवाचा उत्सव साजरा करावा.

या दिवशी केरकचरा काढण्याचे साधन असलेल्या केरसुनीची पुजा केली जाते.ही पुजा करताना तिलाच लक्ष्मी मानले जाते. या प्रथेचा अर्थ आपण काळजीपूर्वक समजून घेतला पाहिजे. केरसूणी स्वच्छता निर्माण करते. जेथे स्वच्छता असते,तेथे आरोग्य, प्रसन्नता, मन:शांती, सौंदर्य, आणि खरीखुरी समृद्धीही येते. हा स्वच्छतेचे महत्व मनावर बिंबविण्याचा संस्कार आहे. पण त्याबरोबरच आपल्याला स्वच्छता देणार्या एका निर्जीव साधनाचीही कृतज्ञतापूर्वक पूजा करणे, ही कृती आपल्याला एक फार महत्वाचा संदेश देणारी आहे. श्रमाचा द्वेष करता कामा नये. श्रमातून, कष्टातून मानवी जीवन स्वच्छ आणि सुखी होते. आता, निर्जीव साधनाचीही अशी पुजा करायची असेल, तर सर्व प्रकारच्या श्रमजीवी लोकांविषयी आणि त्यातही समाजातील ज्या व्यक्ती इतरांना स्वच्छ आणि प्रसन्न जीवन लाभावे म्हणून अस्वच्छता दूर करण्याचे श्रम करतात, त्यांच्याविषयी आत्मीयता आणि कृतज्ञता बाळगणे,हा अतिशय उदात्त संदेश या प्रथेतून घेता येतो.

आश्विन अमावास्येलाच भार–ताचे एक अतिशय महान सुपुत्र तीर्थकर वर्धमान महावीर यांना निर्वाण प्राप्त झाले. त्यांचा उपदेश मानव जातीसाठी हितकारक आणि कल्याणकारक आहे.प्रकाश हे ज्ञानाचे प्रतीक असते आणि वर्धमान महावीरांनी जो ज्ञानाचा आणि मानवी मूल्यांचा उपदेश केला,तो सदैव प्रकाशमय राहणार आहे.त्यांचा हा उपदेश सर्व लोकांपर्यंत पोचावा आणि तो पोचविण्यासाठी आपलाही हातभार लागावा, ही भावना या दिवशी आपल्या मनात उत्कट स्वरूपात जपता येते.

जैन परंपरेमध्ये महावीरांच्या निर्वाणाचा निर्देश मनिर्वाणकल्याणकङ्ग या शब्दाने केला जातो. त्यांचा जन्म, त्यांची ज्ञानप्राप्ति इ.घटना जशा लोकांचे, प्राणीमात्रांचे कल्याण साधणार्या मानल्या जातात, तसेच त्यांचे निर्वाणही कल्याणकारक मानले जाते आणि म्हणूनच त्याचा निर्देश मनिर्वाणकल्याणकफ या शब्दाने केला जातो.

निर्वाणकल्याणकाची संकल्पना आपल्याला जीनव आणि मृत्यू यांच्याविषयी एक आगळा आणि प्रसन्न दृष्टीकोण देणारी आहे. अनेकांतवादाच्या दृष्टीनेच पहायचे, तर जैन परंपरेत ज्याला एका दृष्टीने निर्वाण म्हटले जाते, तो दुसऱ्या दृष्टीने देहाचा अंत असतो, मृत्यू असतो. पण परिपूर्ण जीवन जगून झाल्यानंतरच्या मृत्युकडे विघातक म्हणून न पाहता, त्याला विनाशक न मानता, त्याला कल्याणक मानणे हे मृत्यूलाही अवीट सौंदर्य देणे आहे. म्हणूनच महावीरांच्या निर्वानानंतर लोकांनी दिपोत्सव साजरा केला आहे. या दिपोत्स–वाची अनेक वर्णने आढळतात. नमुना म्हणून इथे काही वर्णनांचे स्वरूप पाहू या. जैन परंपरेतील महरिवंशपुराणफ या ग्रंथात या प्रसंगाचे वर्णन पुढीलप्रमाणे केल्याचे उल्लेख आढळतात :

ज्वलत्प्रदीपालिकया प्रवृद्धया सुरासुरैः दीपितया प्रदीप्तया।
तदा स्म पावानगरी समन्ततः प्रदीपिताकाशतला प्रकाशते।।
हरिवंशपुराण ६६।१९।।

अर्थ : त्या वेळी (महावीरांचे निर्वाण झाले, त्या वेळी) सुर आणि असूर यांनी प्रदीपांच्या (मोठमोठ्या दिव्यांच्या) मालिका प्रज्वलित केल्या.त्या खुप मोठ्या झाल्या,त्या दिपित झाल्या (झळाळू लागल्या) प्रदीप्त झाल्या (अतिशय प्रकाशित झाल्या).त्यामुळे ,जिच्यावरचे आकाश सर्व बाजूंनी प्रदीपित झाले होते,अशा पावानगरीत सर्व आसमंत प्रकाशित झाला.

जैन साहित्यात महावीरांच्या निर्वाणाचे वर्णन पुढीलप्रमाणे करण्यात आल्याचे आढळते,....घरोघर दीप पाजळले गेले.रस्तोरस्ती दीप तेजाळले गेले.जिकडे तिकडे दीपच दीप दिसू लागले. दीपांची रांगच रांग प्रकाशू लागली. दीपांच्या पंक्ति जागोजागी चमकू लागल्या. ते पाहून लोक नाचू लागले. भक्त गाऊ लागले. फ्नम: श्री वर्धमानायफ चा जयघोष दाही दिशांतून घुमू लागला. या अविस्मरणीय आनंदाला नाव देण्यात आले मदीपावलीफत्या दिवसाला नाव मिळालं मदिवाळीफ, आनंदाची दिवाळी, ज्ञानाची दिवाळी, मोक्षसुखाची दिवाळी, भ.महावीरांच्या निर्वाणाची दिवाळी. अमावस्या असून देखील त्या वेळी जगभर पसरलेल्या उद्द्योताचे प्रतीक–स्मृतिचिन्ह म्हणून आजतागायत सामान्य जनता या दिवशी दिव्याच्या ज्योती उजाळून हा आगळा आनंदमहोत्सवी सण अखंड साजरा करीत आली आहे. अखंड साजरा करीत राहणार आहे.

मृत्यूकडे पाहण्याची ही दृष्टी अतिशय सुखद आहे. एका दृष्टीने हे महावीरांनी उपदेशिलेल्या अनेकान्तवादाचे मधुर फळ आहे. मृत्यू हा जीवनाचा शेवट नसून ती जीवनाची परिपूर्णता आहे, परिपक्वता आहे. खरे तर मृत्यू हिच मृत्यूवरची मात आहे, मृत्यूचा पराभव आहे, मृत्यूच्या पलिकडे जाणे आहे. म्हणून हा क्षण दु:खाचा नसून आनंदाचा आहे.बाहेर अमावस्येचा अंधार पसरल्यासारखे दिसत असले, तरी ती प्रत्यक्षात निर्वाणाच्या प्रकाशाची पौर्णिमा आहे. तो मानवी अस्तित्वाचा परमोच्च बिंदू आहे, विकासाची सर्वोच्च अवस्था आहे, आनंदाची परम सीमा आहे!

दिवाळीचे हे प्रकाशमय आणि आनंददायक स्वरूप भारतीय संस्कृतीला एक असाधारण तेज देणारे आहे.

विजयादशमी आणि बलिप्रतिपदा या दोन्ही दिवशी बळीराजाचे कृतज्ञतापूर्वक स्मरण करून आपल्यासाठी उमदी प्रेरणा घेण्याचे विधायक, भावात्मक आणि आपल्या सर्जनशिलतेची अभिव्यक्ति करणारे उपक्रम आयोजित करावेत. या काळात आपली मने बळीराजाच्या आणि बळीराजासारख्या आपल्या प्रेरणास्थानांच्या विचारांनीच भरलेली आणि भारावलेली असावीत. आपल्या मनामध्ये अशावेळी नको त्या व्यक्तींच्या थोड्याशा स्मरणालाही वाव असू नये. आपली मने प्रसन्न राहावीत, यासाठी हे आवश्यक आहे. म्हणून या काळात कोणाच्या प्रतिमांचे दहन करणे वगैरेंसारखे नकारात्मक उपक्रम अजिबात करू नयेत.

मभाऊबीजफ हा अनेक दिवस चालणाऱ्या दिवाळीच्या सणातील प्रत्यक्ष रित्या शेवटचा दिवस होय. भाऊ आणि बहिण यांच्यातील रक्ताच्या आणि जिव्हाळ्याच्या नात्याचे नूतनीकरण आणि दृढीकरण असे त्याचे स्वरूप आहे. बीज म्हणजे द्वितीया. कार्तिक शुक्ल द्वितीयेला हा सण साजरा केला जात असल्यामुळे त्याला मभाऊबीजफ असे नाव देण्यात आले आहे. आपल्या सध्याच्या समाजव्यवस्थेमध्ये मुलीला आयुष्याच्या विशिष्ट टप्प्यावर लग्न करून माहेरातून सासरी जावे लागते.हे स्थित्यंतर अटळ आहे. मुलगी सासरी गेल्यानंतर तिचे जीवन अनेक दृष्टींनी बदलते आणि ती क्रमशः सासरच्या जीवनाशी एकरूप होऊन जाते. असे असले, तरी जिथे जन्म झाला आणि जिथे लग्नापूर्वीचे सगळे आयुष्य व्यतीत झाले, त्या स्थानाबरोबरचे आणि तिथल्या व्यक्तींबरोबरचे सगळे नाते कधीच तुटत नाही. ती सासरी पूर्णपणे सुखी समाधानी असली, तरी देखील माहेरबरोबरच्या नात्याची जपणूक करण्यामध्ये तिला एक विलक्षण आनंद मिळत असतो. सासरी ती अडचणीत वा दु:खात असली, तरी तिला माहेरच्या ममतेची गरज असते. दुसऱ्या बाजूने भावाला आपले घर सोडून अशाप्रकारचे स्थित्यंतर करावे लागत नसले, तरी देखील आपल्या कुटूंबाचा आणि भावविश्वाचा एक अतिशय निकटचा भाग असलेली बहिण आपले घर सोडून दुसरीकडे गेल्यानंतर त्यालाही आपल्या जीवनाच्या परिपूर्णतेसाठी बहिणीविषयीचा जिव्हाळा जपण्याची भावनिक गरज वाटतच असते. आशा रितीने वेगवेगळ्या ठिकाणी आपापल्या संसारात स्थिरावल्यानंतरही भाऊ आणि बहिण यांना आपले नाते जपण्याची उत्कट इच्छा असते. लग्नापूर्वीही ते जप–लेले असते आणि लग्नानंतरही ते जपण्याचा क्रम चालू ठेवण्याची आवश्यकता त्याना जाणवत असते. जिव्हाळ्याची ही जपणूक व्यक्त करण्याचे एक ह्द्य प्रतिक म्हणजे भाऊबीज हा सण होय. या प्रकारच्या भावणेतून हा सण साजरा करून भाऊ आणि बहिण यांच्या नात्याला दृढता देणे हे योग्य आहे.

दिवाळीचा सण साजरा करताना कोणत्याही प्रकारचे प्रदू–षण होणार नाही, याची काळजी घ्यावी.पैशाची उधळपट्टी, संपत्तीचे अनुचित प्रदर्शन, कर्ज काढून सण साजरा करणे इ.अनिष्ट प्रकारही टाळावेत.

**सौजन्य – शिवधर्म गाथा**
**संकलन – रामचंद्र सालेकर**

समृद्धीसाठी सहकार

दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा

जिल्ह्यात ३१ शाखांमधून अविरत सेवा तत्पर सेवेचा वारसा लाभलेली गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्यांची, ठेवीदारांची व सभासदांची बँक

दि गोंदिया डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., गोंदिया

मुख्य कार्यालय गायत्री मंदिर तिरोडा रोड, गोंदिया दुरध्वनी ८७६७८०१९१४ फॅक्स क्र.(०७१८२) २५०४८५

♦ठेवीदारांच्या ठेवीवर आकर्षक व्याजदर ♦बँकेतील ठेवींनादारांना रु.५.०० लक्षा पर्यंत विमा संरक्षण, ♦मुदती ठेवीवर कर्जाची सोय उपलब्ध.♦शेतकऱ्यांना शेती विषयक गरजानुसार सर्व प्रकारचा कर्ज पुरवठा♦बचत गटांना कर्ज पुरवठा ♦गृहकर्ज पुरवठा ♦वाहन कर्ज योजना♦व्यवसायाकरिता मुक्त प्रत्यय कर्ज मर्यादा योजना ♦मालमत्ता गहाण योजना♦वैयक्तिक कर्ज रुपये १५ लक्ष पर्यंत ♦पगारदार कर्मचाऱ्यांना मुक्त प्रत्याय कर्ज मर्यादा.

उपलब्ध सुविधा:-1) Rupay Debit ATM Card द्वारे कुठूनही पैसे काढण्याची सोय 2)RTGS/NEFT सुविधा 3) SMS Alert 4) Any Branch Banking 5) ABPS/NACH द्वारे Direct Benifit सुविधा 6) 19 शाखामध्ये ATM सुविधा. तसेच शाखेत मशीनद्वारे कॅश डिपॉजीट करण्याची सुविधा उपलब्ध.7) मोबाईल ATM VAN सुविधा उपलब्ध.

श्री राजेन्द्र जैन (अध्यक्ष) श्री. राधेलाल पटले (उपाध्यक्ष) श्री.डॉ.अविनाश जायस्वाल (सचिव)

संचालक:- श्री घनश्यामप्रसाद द्वारकाप्रसाद मस्करे, श्री भेरसिंह दुकलूजी नागपुरे, श्री महेशकुमार स्वरुपचंदजी जैन, श्री रेखलाल छंदलाल टेंभरे, श्री पन्नालाल गोपीचंद सहारे, श्री राजकुमार संपतराव कुथे, श्री राजकुमार नेमीचंद जैन, श्री रामलाल बुधाजी राऊत, सौ. प्रियाताई विनोदजी हरिणखेडे, श्री गजानन जगन्नाथ परशुरामकर, श्री केवळराम नत्थुजी पुस्तोडे, श्री अशोक (गप्पु) लक्ष्मीनारायण गुप्ता, श्री अजय शरदचंद्रजी हलमारे, श्री प्रफुल गोपालदास अग्रवाल, श्री भोजराज दाजीबा रहेले, श्रीमती उषाताई भुमेश्वर मेंढे, श्री गोपाल कपुरचंद असाटी(सी.ए.),श्री राजेश जगदीशचंद्र व्यास(सी.ए.)

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री सुरेशचंद्र मधुकर टेटे आणि सर्व कर्मचारी वृंद.







कृषी उत्पन्न बाजार समिती गोंदिया

तर्फे समस्त नागरिकांना दिवाळी गुरुनानक जयंती, कार्तिकी एकादशी, तुळसी विवाह व नुतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

भाऊराव उके, सभापती, कृउबास गोंदिया
राजकुमार(पप्पुभाऊ) पटले, उपसभापती, कृउबास गोंदिया

संचालक मंडळ:-मुनेश रहांगडाले, धनंजय तुरकर,राजीव ठकरेले, चेतन बहेकार, ओमेश्वर चौधरी (बाबा), राधाकृष्ण ठाकुर, जितेश टेंभरे, मुरलीधर नागपुरे, धनलाल ठाकरे, अरुण गजभिये, पंकज यादव, सौ. कौशल तुरकर, सौ. श्यामकला पाचे, सुमित भालोटिया, सुरेश अग्रवाल, विजय उके, सचिन बडवाईक (प्रभारी सचिव)

सहायक निबंधक, सह.संस्था गोंदिया
पदसिद्ध सदस्य एवं समस्त कर्मचारी वृंद, कृषी उत्पन्न बाजार समिती गोंदिया

समितीचे वैशिष्टये:
- १) विदर्भातील सर्वात मोठा मवेशी बाजार दर रविवार उपबाजार काटी २) प्रवाशांची पिण्याचे पाण्याची व शेतकरी विश्रामगृहाची व्यवस्था ३) शासन निर्णयप्रमाणे शेतकऱ्यांकडून आकारण्यात येणारी आडत बंद ४) मोजमाप साठी इलेक्ट्रॉनिक वजन काटे ५) आवार भिंत व सुरक्षा कर्मीसह सुरक्षीत आवार.







स्थापना वर्ष २००४ — विना सहकार नाही उद्धार

नागपूर विभाग शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित चंद्रपूर, रजि.नं.११८

"विश्वासाने गुंतवणूक करावी अशी व कर्जदार सभासद मयत झाल्यास १०० टक्के कर्जमाफ करणारी महाराष्ट्रातील एकमेव कर्मचारी सहकारी पतसंस्था"

समस्त जनतेला दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

साधारण कर्ज ५०.०० लक्ष
मध्यम मुदती कर्ज-५.०० लक्ष
आकस्मिक कर्ज-५० हजार

साधारण, मध्यम मुदती कर्ज आकस्मिक कर्ज व्याजदर, द.सा.द.शे. ११%

१) सर्व प्रकारच्या कर्जाची महत्तम योजना ५० लक्ष राहील.
२) वेतनाच्या प्रमाणात कर्ज वितरण करण्यात येतील.
१) मासिक आवर्त ठेव-१ ते ५ वर्ष ९% २) मुदत ठेव-१ ते ५ वर्ष ९% ३) मासिक आय योजना-रु.१,००,०००/-गुंतवा द.सा.द.शे.८,४०% दराने दरमहा मिळवा रु.७००/- व्याज मिळवा. ४) भाग्यलक्ष्मी आवर्त ठेव-दरमहा रु.१०००/- च्या आवर्त ठेवी गुंतवणुकीच्या ७५ महिन्यानंतर रु.१,००,०००/- मिळेल. ५) दामदुप्पट योजना-८४ महिन्यानंतर दामदुप्पट (७ वर्ष)

आम.श्री. सुधाकर अडबाले (महाराष्ट्र विधान परिषद) संस्थापक अध्यक्ष तथा तज्ञ संचालक

श्री. सुरेंद्र अडबाले (अध्यक्ष), श्री. सुनिल शेरकी (उपाध्यक्ष), श्री. दिनकर अडबाले (मा. सचिव), श्री. शरद डांगे (खजिनदार)

संचालक:-श्री. ज्ञानेश्वर सोनुकसरे, श्री. मनिष नामदेवराव कन्मवार, श्री. विनोद रणदिवे, श्री. किशोर पाचभाई, श्री. नितीन जिवतोडे, सौ. शिला ताजणे, श्रीमती चारूशिला जोगी, श्री. सचिन मोहितकर, श्री.श्रीकांत पोडे, श्री. प्रकाश अडबाले (कार्यरत संचालक)

ऊन सावल्या येतील जातील
कोंब जपावे आतील हिरवे
चला दिवाळी आली आहे
ओंजळीत घ्या चार दिवे
पहिला लावा थेट मनातच
तरीच राहील दूसरा तेवत
घरात आणि प्रियजनांच्या
आयुष्यावर प्रकाश बरसत
तिसरा असू दे इथे अंगणी
उजेड आल्या गेल्यानाही
चौथा ठेवा अशा ठिकाणी
जिथे दिवाळी माहित नाही
।। शुभ दीपावली।।




# गोंदिया जिल्हा पोलिसांच्यावतीने

# जनतेला आवाहन




गोंदिया जिल्हा पोलिस दला तर्फे जनतेला आवाहन करण्यात येत आहे की, दिवाळी सणा निमित्त बाजार पेठेमध्ये आर्थीक व्यवहार, खरेदी होत असल्याने मोठ्या प्रमाणात मालमत्ते व शरिराविरुद्धचे गुन्हयात वाढ होत आहेत. तरि अशा गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणून जनतेने सतर्क राहून मालमत्तेचे रक्षण करण्याचा दृष्टीने अतिदक्षता बाळगावी, तसेच वाहने चालविताना वाहतुकीचे नियमाचे काटेकोरपणे पालन करावे, फटाके उडवितांना जाळपोळ सारख्या घटना टाळण्याच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घ्यावी.


हा सण तुमचं यश
आणि आनंदाचा मार्ग
उज्ज्वल करो!
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा



संजय टेंभरे
सभापती
अर्थ व बांधकाम समिती
जि.प.गोंदिया

समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

-:शुभेच्छुक :-
कमलेश लिल्हारे व लिल्हारे ब्रदर्स

समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !

-:शुभेच्छुक :-
अग्रवाल ब्रदर्स, गोंदिया
बाजार चौक, गोंदिया

सभी नागरिकों, ग्राहकों को दीपावली की हार्दिक शुभकामनाएँ

**श्री हलवाई होटल असोसिएशन**
श्री टॉकीज रोड, गोंदिया-४४१६०१
फोन नं.(०७१८२) २३७५५६,
लॉज फोन नं. (०७१८२) २३७०७६

सर्व सुविधायुक्त आरामदायक व सबसे किफायती ए.सी.कमरे, एवं ए.सी. डोरमेट्री रुम ४००/- अत्यंत उचित किराये पर उपलब्ध.

अशोककुमार चौधरी — अध्यक्ष
महेंद्रभाई हालानी — कोषाध्यक्ष
नरेशकुमार अग्रवाल — सचिव
एवं समस्त सदस्यगण.

जिल्हावासीयांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्या. खुर्शिपार
**आयर्न ओर खाण**
ता.आमगांव, जि.गोंदिया

समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, गोंदिया

समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
जिल्हा परिषद लघुसिंचन विभाग, गोंदिया

समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !



-:एक शुभेच्छुक :-
पी.डी.

समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !





-:एक शुभेच्छुक :-
एल.आर.

### “ती” अशक्त नाही

नकोरे समजू तिला अशक्त
तिच्या नसानसात आहे तुझेच रक्त
मुलगाच पाहिजे हा हट्ट तू का धराला
तुझा जन्म स्त्रीच्याच पोटी झाला हे कसा रे विसरला
बनेल तीही कोणाची बहिण, बायको आणि सासू
येऊ देऊ नकोरे तिच्या डोळ्यात एकही आसू
कमी पडू देऊ नको तिला शिक्षणात काही
पुरव तिला पुस्तक, पाटी, सर्वकाही
शिक्षणाबरोबर जोड असू दे संस्कारांची
जोडेल ती माणसे सासरची आणि माहेरची
मुलगी मुलापेक्षा काही कमी नाही
मुलगाच काळजी घेईल याची हल्ली हमी नाही
ज्यांना मुलच नाही त्यांची जरा आठवण कर
देवाने तुला आशीर्वादित केलं म्हणून त्याचं स्तवन कर.

**राज धुदाट** (८४८५८७७२३२)
जयसिंगपूर (कवितासागर)

समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!
-:शुभेच्छुक :-
पोलीस स्टेशन गोरेगाव

आपको दीपावली की ढेर सारी शुभकामनाएं!
वाहन चालवितांना हेल्मेटचा वापर करा, मोबाईलवर बोलणे टाळा,
वाहनांचे कागदपत्र जवळ ठेवा
वाहतुक शाखा व शहर पोलीस स्टेशन, गोंदिया

जो करील धूम्रपान, त्याचे जीवन होईल घाण.
-: एक शुभेच्छुक :-

समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
मुख्य लेखा वित्त अधिकारी जि.प. गोंदिया

समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
दुय्यम उपनिबंधक कार्यालय, गोंदिया

असंख्य फुलांचा गंध तुमच्या जीवनात दरवळू दे
शुभ दिपावली
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
-: शुभेच्छुक :-
जि.प. सार्वजनिक बांधकाम उपविभाग गोंदिया

आपको दीपावली की ढेर सारी शुभकामनाएं!
डी.जे.ग्रुप,गोंदिया

आपको दीपावली की ढेर सारी शुभकामनाएं!
एम.टी.गोंदिया

आपको दीपावली की ढेर सारी शुभकामनाएं!
व्ही.ए.ग्रुप दुर्गा चौक, गोंदिया

असंख्य फुलांचा गंध तुमच्या जीवनात दरवळू दे
शुभ दिपावली
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
-:एक शुभेच्छुक:-
एम.बी.

समस्त जनतेला दिवाळी व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.१ गोंदिया

# गावाकडची दिवाळी



'दिन दिन दिवाळी... गाईम्हशी ओवाळी...

गाई म्हशी कुणाच्या... लक्षुमनाच्या... 'ही लोकगीतं ७०-८०च्या दशकातल्या दिवाळी सणाला गावखेड्यात हमखास म्हटली जायची. ग्रामीण लोकम ानसात ती खोलवर रुजल्यानेच त्याच प्रतिबिंब ग्रामसंस्कृतीच्या पानांपानांत उमटल्या गेलं . आज काळ बदलला तसे आपल्या सण - उत्सवांचे स्वरूपही बदलले . मात्र, गावाकडच्या दिवाळीची कसलीही सर त्याला यायची नाही. हे ही तितकेच खरे .

मराठी कालगणनेतील आश्विन व कार्तिक महिन्यात दसरा व दिवाळी हे दोन प्रमुख सण येतात . त्यापैकी दिवाळी सण म्हणजे भारतीय सणांची साम्राज्ञी. अंगात हुडहुडी भरवणाऱ्या थंडीच्या दिवसात येणाऱ्या या सणाची थोरवी आपल्या प्राचीन ग्रंथसंप्रदेत आलेल्या वेगवेगळ्या आख्यायिकांमधून तसेच संतवाङ्मयातून वाचायला मिळते .

संत ज्ञानेश्वरांनी आपल्या भावार्थदीपिकेत....

"मी अविवेकाची काजळी खफ ेडोनि विवेकदीप उजळी ?

तै योगिया माजी दिवाळी निरंतर? या सारख्या ओवीतून दिवाळी सणाचे महत्व प्रतिपादीत केले आहे. तर संत तुकोबांनी ङ्ग साधुसंत येती घरा तोचि दिवाळी दसरा ? असे सांगून या दोन्ही सणांचे भारतीय जीवनातील स्थान उजागर केले आहे .

दिवाळी हा सण शेतात राबणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांचे प्रकाशपर्व असल्याने नागरी जीवनापेक्षा ग्रामीण भागात हा सण मोठया उत्सवाने साजरा केला जातो. माझ्या शिरजगाव बंड या गावाकडची दिवाळी मी बालपणापासून अनुभवत आलो आहे. त्यातील गोडवा शब्दात मांडत असता या प्रकाशपर्वाच्या हृदयात साठवून ठेवलेल्या अनेक गोड आठवणींचा मागोवा घेताना आजही मनाच्या प्रकाशवाटा लख्पणे उजळून निघतात. दिवाळीला ग्राम संस्कृतीत दिलेले महत्व पाहून... गतकाळात साजऱ्या झालेल्या दिवाळीचे ते ... दिवस डोळ्यासमोर प्रत्यक्ष उभे राहतात.

माझ्या गावाकडच्या दिवाळीची खरी चाहुल लागायची ती आठवीपूजनाने. ज्वारी, कापूस यासारखी पिके घरात आलेली असत. ती विकून किंवा पदरमोड करून गावाशेजारी असलेल्या चांदूर बाजार येथून घरातील प्रत्येकाला नवीन कपडे व सामानसुमान खरेदी केल्या जाई .आठवीच्या दिवसापासून गावात गुरे चारणारे गुराखी पोरे सांच्याला लह्याच्या गवताची अष्ठकोणी झेंडाई गुंफून त्यात शिजवलेल्या भाताचा दिवा लावत. त्या दिव्याने त्यांच्याकडे चराईसाठी असणाऱ्या प्रत्येक घरच्या गुरांना ते ओवाळत असे. गुरांना ओवाळतांना ...

"आली आली रे दिवाई ेढोरक्या काढती झेंडाई ेदिवा केलासे भाताचा ख चौक भरला मोत्याचा शेवटी ओवाया ओवाया ख लागा कपीलेच्या पाया

अशी दिवाळसणाची पारंपारीक लोकगीतं ते गात असत. त्यांच्या या बोलीतील लोकगीतात एक प्रकारची लयबद्धता असायची. त्या गीतातून खेडूत जीवनाचे प्रतिबिंब दिसून येत असले तरी प्रामुख्याने त्या गाण्यात शेती, शेतकरी, गोधन असा एकूणच ग्राम जीवनाचा संदर्भ असे. यात ग्रामसंस्कृतीतील बारा बलुतेदारांच्या व्यवसायाचे व त्या व्यवसायातून गावाशी जुळलेल्या नात्याचे हृदयस्पर्शी वर्णन मांडले जात असे .ङ्ग चला जाऊ कुंभार पाहू कुंभार मडकी काय घडवितो चला जाऊ चांभार पाहू चांभार रापी काय चालविते आपल्या व्यवसायातून गावगाडा चालवणाऱ्या या श्रमीकांच्या, कष्टकऱ्यांच्या नात्यांतील वीणीचे बदुपदर गाण्यातून उलगडले जायचे .

भाऊबिजेचे महत्व बोलीत मांडणाऱ्या .....

पाचा दिवसाची दिवाई बहीण भावाले ओवाई ेया गाण्यातून बहीण भावाच्या नात्याचे बंध अलगदपणे उलगडले जाऊन त्याचे पावित्र्य मांडले जाई

माझ्या गावाकडच्या दिवाळी सणाची तयारी गावकरी पितृपक्ष पंधरवाडा म्हणजेच अखरपखापासूनच करत असे. त्यासाठी पावसाळ्यात पडझड झालेल्या मातीच्या घराची डागडुजी करून घराची रंगरंगोटी केली जात असे. गावाकडच्या खेडूत माणसांच्या मनात सणांबाबत भोळी श्रध्दा असल्याने येथील दिवाळी पाच दिवस चालायची.

वसुबारसेपासून माझ्या गावाकडच्या दिवाळीला साधारणतः सुरवात व्हायची .लक्ष्मीपूजनापूर्वी येणारा वसुबारस हा सण आश्विन महिन्यातल्या वद्यद्वादशीला साजरा केला जात असे. यालाच गोवत्स द्वादशी असेही म्हणतात. या दिवशी गोधनाची पूजा केली जायची. समुद्रमंथनाच्या वेळेस पाच कामधेनू उत्पन्न झाल्या होत्या त्यापैकी नंदा नामक धेनूस उद्देशून हे व्रत केले जात असल्याची आख्यायिका आहे. ह्या दिवसापासूनच घरासमोर रांगोळ्या काढल्या जायच्या. गावातील काही बाया या दिवशी उपवासही धरत असे. त्या उपवासात गहू व मूग खात नसत तर बाजरीची भाकर व वांग्याचे भरीत खाऊन उपवास सोडल्या जायचा. घर धनधान्यांनी भरून जावे , घरातील मुला-बाळांना चांगले आरोग्य मिळावे , सर्वांना सौख्य लाभावे यासाठी ही पूजा केली जात असल्याचे जुनी जाणती मंडळी सांगत असे. बारसेपासून पुढील पाच दिवस मातीच्या उजवणीत तेलाचे दिवे लावले जात . कापसाचे पिक बळीराजाच्या घरात आल्याने नवीन कापसाच्या वाती दिवे लावण्यासाठी वापरल्या जात असे.

दिवाळीत भल्या पहाटे उठून सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान उरकल्या जाई. या स्नानासाठी नागरमोथा, हळकुंड कुटून तयार केलेल्या सुगंधीत उटण्याचाच आवर्जुन वापर केला जायचा. मला लहानपणी आंघोळीचा खूप कंटाळा यायचा. पण आई मारून मुकटून इतक्या थंडीतही आंघोळ करायला लावायची. माझ्या घरची परिस्थिती गरीबीची असली तरीही आई सगळ काही निट करायची. तिच्याकडे शेतात मोलमजुरी करण्याशिवाय दुसरी कोणतीही जादू नव्हती याची जाणीव मला कळत्या वयात झाली.

माझ्या गावाकडची दिवाळी आठवली की, दिवाळीच्या पहिल्या दिवसाला म्हणजेच धनत्रयोदशीला अभ्यंगस्नान करुन धन्वंतरीची पूजा केली जाई. दिवाळीचा दुसरा दिवस नरकचतुर्दशी, तिसरा दिवस लक्ष्मीपूजनाचा. अमावस्येच्या सायंकाळी घरोघरी लक्ष्मीची पूजा मांडून तिचे पूजन केल्या जात असे. या पूजेत नुकतीच कापणी करून घरात आलेल्या नवीन धान्र्याच्या राशीवर लक्ष्मीची प्रतिमा काढून तिचे पूजन करण्याचा प्रघात होता. या दिवशी प्रत्येक घरी पुरणपोळीचे जेवण बनवले जायचे .

लक्ष्मीपूजनाच्या रात्रीला गुरांना ओवाळणारे गुराखी व गावातील पोरे गवळण काढायचे. या गवळणीत शेती व्यवस्थेचे वर्णन असलेली लोकगीतं म्हटल्या जाई. या गीताच्या शेवटी नाच्यापोरं घुसळण घालून रई फ्फिरवायचे . राधाकृष्णाच्या रासक्रीडेचे शृंगारीक वर्णन या गवळण गीतातून मांडल्या जाई. लोककलेतील मवग या कला प्रकारात मोडणाऱ्या या गवळण गीतात रंगा रंगाच्या गौळणी हो गौळणी े आल्या गोळून सोडूनी ख

पहिली गौळण हिरवा रंग फुगडी खेळे कृष्णा संग ख या सारख्या नाटय रुपांतराचे सादरीकरण घरोघरी जाऊन केल्या जात असे. या फडात ढोलकी, चोणके (तुणतुणे), बासरी, मंजीरा, झांज आदि वादये वापरली जात. या गवळणीचे खास वैशिष्ट्य म्हणजे यात लुगडे घालून स्त्री वेषात नाचणारा हा पुरुष असायचा. नाच्यासोबत नाचणारा गवळी डोक्यावर रंगीत फ्फेटा घालून तोंडाला रंग फासून फ्फेर धरून नाच्याची साथ करत असे. बाकीचे वादक गाण्यांची झिल ओढत मुख्य गायकाची साथसंगत करायचे. या गाण्यात लयबध्दता असल्याने ते कानाला आनंद देत कष्टकरणाऱ्या सगळ्याचे मनोरंजन करायचे. या गवळण गीतात शृंगार असला तरी ही सर्व गाणी भक्तीरस पूर्ण असल्याने त्यात कसलाही वात्रटपणा नसायचा. त्यामुळे घरातील मुलाबाळांसह ही गवळण बघीतली जायची. त्यामुळे घरकाम करणाऱ्या बाया बापड्यांना तितकाच विरंगुळा मिळायचा .या पथनाट्याचा शेवट दह्याची रवी लावणाऱ्या गीतांने व्हायचा.

घुसळण घातलदादा कोण्या गवळ्याची राधा

दही लो दही लो पुकारा ेचली गवळण दही लो मेरा ख म्हणत हा फ्फड लगेच पुढच्या घराच्या अंगणात जायचा... या मुलांना गावकरी चार दोन रुपये , धान्य व फराळ्याचे पदार्थ देऊन त्यांचा निरोप घ्यायचे. दिवाळीच्या पंधरा दिवसानंतर मिळालेल्या धान्याचा ही गवळण काढणारी मुले स्वयंपाक करून सामुहिक भोजन करायचे. बोलीभाषेत त्याला पोस म्हटल्या जाई. त्यात बक्षिस देणारा प्रत्येक जण आमंत्रित असायचा.

दिवाळीच्या चवथ्या दिवशी येणाऱ्या प्रतिपदेला कष्टकरी शेतकऱ्यांचं प्रतीक म्हणून बळीराजाची पूजा केली जायची. आणि दीपावलीच्या पाडव्याला येणारी भाऊबीज हा दिवळीचा पाचवा दिवस अत्यंत कौटुंबिक वातावरणात साजरा केला जाई. बीजेच्या दिवशी बहीण भावाला ओवाळून भावाच्या दीर्घारोग्यासोबतच सुखसमृद्धीची कामना करायची. माझ्या गावाकडच्या दिवाळीत आजच्यासारखी फ्फटाक्यांची आतिषबाजी नसली तरी गावातील श्रीमंतांच्या अंगणात फ्फुटणाऱ्या फ्फटाक्यांची मज्जा लुटायला सारा गाव जमायचा हे वेगळे सांगायला नको.

दिवाळीचा फराळ बनवण्यासाठी त्या काळी गावातील बाया मंडळी शेजारपाजारांच्या घरी जाऊन एकमेकींना मदत करत असतांना मी पाहीले आहे. त्या फ्फराळात पिठीची करंजी, लाडू, अनारसे, तिळाचे लाडू ,गुळपापडी, तिळाची करंजी चिवडा व चकली यासारख्या पदार्थांचे वाण घरोघरी दिसून येत. या पदार्थाची चव चाखण्यासाठी दिवाळीनंतर सुरु व्हायचे ते फराळपर्व. माझ्या गावात एकमेकांना घरी फ्फराळासाठी बोलाविण्याची पद्धत होती . या फ्फराळातील गोडव्यासोबतच गावातील नात्यांचा गोडवा व परस्परांमधील विश्वासही वृध्दींगत होत असे.

माझ्या गावाकडच्या दिवाळीच्या अनेक आठवणी आहेत. त्या सर्वांचं एक गाठोडं बांधून ते मी माझ्या हृदयाच्या कप्प्यात कायम जपून ठेवलं आहे. माझ्या गावाकडची दिवाळी ही आजच्यासारखी पैशाने श्रीमंत नसली तरी त्यातील मनाची श्रीमंती दिवाळीच्या फ्फराळातील करंजीत ठासून भरलेल्या पिठ्ठीसारखी होती. त्यामुळेच ती दिवाळी माझ्यासाठी गावातील भावकी जपणारी, नात्यांचा गोडवा देणारी एक आनंद पर्वणी अशीच राहीली आहे. त्या सर्व आठवणी गाठोडयातून काढून एकाच लेखात मांडणे शक्य नसल्या तरी, माझ्या गावाकडची दिवाळी म्हणजे आनंद ... आनंद ... आणि आनंद .... त्या आनंदाच्या डोही तरंगणारा तो निखळ आनंद पाहून आजही डोळे पाणावतात. दिवाळी म्हणजे .... प्रकाशाची पूजा .... आणि म्हणूनच भारतीय संस्कृतीत या सणाबद्दल म्हटले गेले ते , ङ्ग तमसो मां ज्योतिर्गमय .... अंधारातून प्रकाशाकडे नेणारी ही दीपावली आता तिच्या बदललेल्या स्वरूपात आज साजरी करताहोत आपण. पण जुन्या काळ्या दिवाळीला आजच्या आतिषबाजीची सर केव्हाच येणार नाही. म्हणूनच म्हणावेसे वाटते ... गेले ... ते दिन गेले .

**जयकुमार चर्जन, परतवाडा, अमरावती, मो .९४२०७१३९९८**



















उजाडली ऊषा
दाही दिशा,
उमलत्या स्वप्नांची,
मनात आशा,
धुंद ही निशा,
मनाची दशा,
हृदययाचा
आसपास,
प्रेमाची नशा,
प्रकाशाची आस,
दिव्याची वात,
ऊमलत्या कळीस,
सुगंधाची साथ.

**सोनाली रायपुरे/शहारे**





















# दीपावली आणि फटाके



सांप्रतकाळी दीपावली म्हटलं की त्याचा सरळ संबंध फटाक्यांशी येतो. एकिकडे दिवाळी हा प्रकाशाचा सण म्हणून साजरा करत असतांना दुसऱ्याबाजूने फटाके फोडून आनंदही साजरा केला जातो. फटाके फोडण्यातून आनंद जरी मिळत असला, तरी त्यापासून होणाऱ्या दुरगामी दुष्परिणामातून कितीतरी अधिक पटीने दु:खाची व आरोग्याची हानी होण्याची वेळ येते याचेही भान असले पाहिजे.

फटाक्यांमुळे कधीकधी जीवनात कायमचा अंधारही येण्याची शक्यता असते. देशभरात दरवर्षी हजारो लोकं फटाक्यांमुळे अंध होतात आणि त्यांच्या जीवनात कायमचा अंधार दाटतो. काही ठिकाणी लहान मोठे अपघातही घडतात. कुठे–कुठे आगीही लागतात.

बेरियम आणि तत्सम रसायनांपासून तयार झालेल्या फटाक्यांवर सर्वोच्च न्यायलयाने बंदी घातली आहे. ही बंदी फक्त दिल्लीतच नव्हे संपूर्ण देशात लागू होईल असं न्यायालयाने म्हटलं आहे. दिवाळीच्या काळात ध्वनी आणि वायू प्रदूषण कमी व्हावं या उद्देशाने सुप्रीम कोर्टाने नुकतेच निर्देश दिलेले आहे.

जस्टीस एम आर शाह आणि जस्टीस बोपन्ना यांच्या खंडपीठाने इ.स.२०२१ च्या सुनावणीत स्पष्ट केलं की देशाच्या व राज्याच्या कुठल्याही भागात बेरियम किंवा प्रतिबंधित फटाके यांचं उत्पादन आणि विक्री तसंच खरेदी करून त्यांचा उपयोग केला गेला तर त्यासाठी राज्याचे मुख्य सचिव, पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक तसंच संबंधित पोलीस स्टेशन यांना जबाबदार ठरवलं जाईल. सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले होते की दिवाळीच्या आधी जे फटाके तयार केले जातात त्यात बेरियम किंवा कुठल्याही प्रतिबंधित रसायनांचा वापर केला जाऊ नये.

फटाक्यांवर सरसकट संपूर्ण बंदी जरी घालण्यात आलेली नसली तरी ज्या फटाक्यांमध्ये बेरियमचा वापर आहे त्या फटाक्यांवर बंदी घालण्यात आलेली आहे. पण पर्यावरणपूरक फटाके पेटवण्यास, उडवण्यास संमती आहे. मुळातच देशातल्या अनेक भागात वायू प्रदुषणाचा प्रश्न गंभीर झालेला आहे. महाराष्ट्र सरकारच्या आरोग्य विभागाने राज्यातल्या सतरा शहरांना वायू प्रदूषणाबाबत खबरदारी पाळण्याचे आदेशही दिले आहेत. हे ही नसे थोडके.

वातावरणातील हवेत झच २.५ आणि झच १० अशी दोन प्रमुख प्रदूषकं असतात. या कणांच्या आकारावरून त्यांना हे नावं मिळाली आहेत. अडीच मायक्रॉनपेक्षा कमी फटाके उडवल्यानंतर त्यातून मोठ्या प्रमाणावर सुक्ष्म कण हे बाहेर पडतात.

विशिष्ट मायक्रॉन व्यास असणाऱ्या कणांना झच२.५ म्हणतात तर २.५ ते १० मायक्रॉन एवढा आकार असणाऱ्या प्रदूषकांना झच१० असं म्हणतात. विशेष म्हणजे हे कण उघड्या डोळ्यांना दिसत नाहीत. त्यामुळे ते अगदी सहज नाकातून किंवा घशामधून शरीरात जातात. त्यांच्यामुळे दमा, हृदयविकार, ब्राँकायटिस आणि श्वसनाचे इतर आजार होऊ शकतात. याशिवाय फटाक्यांमध्ये जड धातूंसह इतरही विषारी घटक असतात. जमशेदपूरमध्ये याबाबत एक स्वतंत्र अभ्यास करण्यात आला. त्यात दिवाळीच्या काळात हवेमध्ये खालील घटकांत उल्लेखनीय वाढ झाल्याचं पाहायला मिळालं. ते कण म्हणजे–झच१० कण, सल्फ फर डायऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड, ओझोन, आयर्न, लेड, मँगनीज, कॉपर, बेरिलियम, निकेल इत्यादी होय. सरकारच्या केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानंही फटाक्यातील १५ घटक धोकादायक आणि विषारी असल्याचं स्पष्ट केलं आहे. त्यामुळेच दिवाळीनंतर भारतातल्या अनेक शहरांमध्ये श्वास घेणं मुश्कील होतं आणि श्वसनाचे आजारही बळावतात.

भारतीय राजकारणी, शासन, प्रशासन, धर्ममार्तंड यांनी फटाक्यांना संस्कृतीशी आणि धर्माशी जोडलेलं आहे. जनता नाराज होऊ नये म्हणून ते संपूर्ण बंदी होऊ नये अशीच त्यांची भूमिका राहिलेली आहे. त्यामुळेच फटाक्यांवर वारंवार बंदी घातली तरी त्याची निट अंमलबजावणी होत नाही. न्यायालयाने म्हटल्यानंतर बंदी व्हायला पाहिजे, पण ते त्यास बगल देणारे मार्ग शोधतात.

काही महाशय फटाक्यांवर सरसकट बंदी आणली तर त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांच्या रोजगाराचे काय होईल? असे प्रश्न उपस्थित करतात. गावठी हातभट्टीची दारू हा सुद्धा काही लोकांचा रोजगार आहे. तेव्हा तो कसा बेकायदेशीर ठरवता? असे कितीतरी उदाहरण देता येऊ शकतील.

रोजगार प्राप्ती करिता अनेक सरकारी योजना आहेत. रोजगार निहाय स्वतंत्र प्रशिक्षण देण्याच्या योजना आहेत. त्यामुळे अशा जीवघेण्या व्यवसायातच लोकांनी काम केलं पाहिजे असं अजिबात आवश्यक नाही.

काही महाशय म्हणतात, तुम्ही विशिष्ट धर्माच्या विरोधात प्रचार करता. धर्म किंवा संस्कृतीशी फटक्यांचं जोडलं जाणं हाच खरा कळीचा मुद्दा आहे. त्यामुळे त्याचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम विसरून चालणार नाही.

भारतातले लोक हे धर्माच्या नावाने विभाजित झाले आहेत. त्यामुळे असे काही नियम आल्यानंतर म्हणतात, की फक्त आमच्याच धर्माच्या सणांच्या बाबतीत असे बंधन का? इतर धर्मियांचे सण दिसत नाहीत काय? न्यू इयर दिसत नाही का? असे निर्थक तर्क देतात. त्यांनी हे सुद्धा लक्षात घ्यायला हवे, की हवा ही हिंदुंची वेगळी, मुस्लीमांची वेगळी, ख्रिश्चनांची वेगळी अशी नसते. वातावरण हे सदोदित धर्मनिरपेक्ष असतं. एकाच हवेतून आपण सर्व ऑक्सिजन घेतो. धर्म, संस्कृती, परंपरा या मानवानेच स्वानंदाकरिता तयार केलेल्या आहेत. या सर्व बाबी माणसासाठी असतात. त्या मानवचे हीत साधणाऱ्या असताता. त्या अहित करणाऱ्या असू नयेत. धर्मिक सणोत्सव, परंपरा या मानव जातीचे अहित करत असेल; मानवी आरोग्यावर व जिवावरच संकट बणत असेल तर त्या धर्मावर आधारित सणोत्सवांना, परंपरांना मानवी हितासाठी वेळीच तिलांजली दिलेलीच बरी.

जल, वायू, ध्वनी आदी प्रदुषण हे धार्मिकतेच्या व परंपरेच्या मान्यतेतून होऊ घातले असेल तर अशावेळी भारतीयांनी भावनाशील होण्याची गरज नाही. तत्संबंधीचे नियम हे पाळलेच पाहिजे. वरपांगी दिखाऊपणा न ठरता वर्तनातून परिवर्तन दिसले पाहिजे.

वर्षांतून एकदाच दिवाळी येते. त्यामुळे फटाके उडवले तर काय बिघडले? असं म्हणत नियमांचं उल्लंघन केलं जातं. प्रदुषण हे केवळ फटाक्यांनीच होतं असे नाही. हे जरी एका बाजूने खरं असलं तरी त्याचे दोन भाग करता येऊ शकतात. एक म्हणजे टाळता येण्यासारखं प्रदूषण आणि दुसरे म्हणजे टाळता न येण्यासारखं प्रदूषण. रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांद्वारे तसेच उत्पादन क्षेत्रातिल कारखाने यांद्वारे होणारे प्रदुषण हे न टाळता येण्यासारखं प्रदूषण आहे. ते कमी करण्यासाठी प्रयत्न केले जाऊ शकतात पण ते संपूर्णपणे थांबवता वा टाळता येत नाही. फटाक्यांनी होणारं प्रदूषण मात्र टाळता येण्यासारखं प्रदूषण आहे. त्यामुळे ते संपूर्णपणे थांबवता येऊ शकतं. त्यासाठी राजकीय व सामाजिक इच्छाशक्तीची नितांत गरज आहे.

आधी फटाके उत्पादनावर बंदी घाला, मगच विक्रीवर. एकीकडे उत्पादन करायचे, फटाके विक्रीसाठी स्टॉल्सला परवानगीही द्यायची आणि जनतेवर मात्र ते फोडण्यासाठी बंदी घालायची; इथेच न्यायतत्त्वाची व मानवी हितसंबंधाची हत्या होते. फटाके बणवले जातात म्हणून ते विकले जातात. सहज मिळतात म्हणूनच ते फोडले जातात. सामान्य जनता, राजकारण आणि प्रशासन यांनी एकत्र आल्याशिवाय फटक्यांवरची बंदी प्रत्यक्षात येऊ शकत नाही.

फटाक्यांच्या विक्रीच्या माध्यमातून हंगामी उत्पन्न मिळत असले तरी फटाक्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे मानवाचे कायम स्वरूपी नुकसान होते त्याचे काय? असा व्यापक विचार होताना दिसत नाही. फटाके विक्रीतून चार लोकांना मिळणारा रोजगार व नफा महत्त्वाचा मानायचा की त्यातून होणाऱ्या वायू प्रदूषणामुळे पर्यावरणाची आणि पर्यायाने मानवाची होणारी हानी अधिक गांभीर्याने घ्यायची? याचा विचार कधीतरी आपण करणार आहोत की नाही?

कोणी ठरवून दिलेल्या वेळेच्या पलीकडे फटाके फोडत असेल, किंवा ते जास्त आवाज करणारे असेल तर कारवाई करण्याचे पोलिसांना अधिकार आहेत. परंतु हे पोलीस साधे अदखलपात्र गुन्हेही ते दाखल करत नाहीत. किमान गुन्हे दाखल करून संबंधित दोषी कुटुंबांना पोलीस ठाण्यात बोलवायला हवे. त्यांना समज द्यायला हवी. त्यांचं काऊन्सिलिंग करायला हवे. फटाके फोडल्याने पोलीस कारवाई होते किमान हा संदेश तरी समाजात जायला हवा. सायंकाळी व रात्री सर्वाधिक फटाके फोडले जातात. दिवाळीच्या अन्य दिवसांतही हमखास ते वाजतच असतात. अमुक हजार रुपयांचे फटाके आणले आहेत, याचे भूषण वाटणारे महाभागही आहेत. एका बाजूला लक्ष्मीची विधीवत पूजा करायची आणि दुसऱ्या बाजूला लक्ष्मी देवतेचे स्वागत फटाक्यांचा कचरा आणि धूर करून करायचे ही विसंगती न वाटता तसे न करणाऱ्यांची टिंगल केली जाते. फटाके विक्रेता, फटाके फोडणारे आणि ते न फोडणारे असे सर्वच जण याच निसर्गातून मिळत असलेल्या प्राणवायूवर जिवंत आहेत. पण त्या निसर्गाची चिंता केवळ फटाके न फोडणाऱ्या मंडळींना असते आणि यांनाच ते मूर्खात काढतात.

प्रदूषणामुळे श्वास कोंडत असतांना देखील फटाक्यांवर बंदी आणायचा सरकार पातळीवर विचारही होत नाही याचे खरंच आश्चर्य वाटते. कोणत्याही पक्षाचे सरकार आले तरी फटाके बंदी येणे अशक्य वाटते. कारण निसर्गाकडे गांभीर्याने पाहण्याची तथा व्यापक विचार करण्याची कुवतच राजकीय पुढाऱ्यांमध्ये दिसत नाही. दोन – चार वृक्ष लावताना फोटो काढले की झाले निसर्गाचे संवर्धन. असे करून निसर्ग व पर्यावरण जपता येत नाही. याची कल्पना असूनही औपचारिकतेला पर्याय नाही असेच त्यांचे वागणे असते. फटाके फोडण्यासाठी कोर्टाने सायंकाळी ७ ते १० अशी तीन तासाची ठरावीक वेळ घालून दिली तरी त्याचे कोणीही पालन करत नाही. कारण फटाके फोडणाऱ्या लोकांचा आणि वेळेचा दुरान्वयेही संबंध नसतो. फटाके फोडण्याची वेळ ठरवणे ही एक औपचारिकता आहे. फटाके फोडा पण ठराविक वेळेत अशी भूमिका घेतली तर फटाके बंदीची अंमलबजावणी होणे अशक्यच!

फटाके फोडण्यासाठी होणारा पैस्याचा अपव्यय करण्यापेक्षा गरिबांना दिवाळीचा फराळ द्या. कपडे द्या. गोडधोड भोजन द्या. फटाक्यांऐवजी या नेक कार्यासाठी पैसे खर्च करता येतील. आपल्यामुळे कोणाची दिवाळी गोड झाली तर चांगलेच आहे ना! इतका साधा नेक विचार करण्यासाठी बुद्धी चालवण्याची इच्छा नसणे यासारखा माणूसकी शून्यपणा दुसरा नव्हे. बरं, कोणाला काही द्यायची नियत नसेल तर फटाके वाजवून किमान निसर्गावर आणि श्वासाशी निगडीत विकार असणाऱ्या रुग्णांवर अन्याय तरी करू नका.

लहान मुले पालकांकडे फटाक्यांसाठी प्रचंड हट्ट धरतात. त्यामुळेच आम्हाला फटाके विकत घेणे भाग पडते. मुलांच्या रडण्याने, उच्छाद मांडण्याने नाईलाज होतो. असा तर्क देणारे पालक हे केवळ स्वतःच्या पाल्याचाच व पाल्य हे स्वतःपूर्ताच विचार करतात. मुलांचे स्वतःपूर्ते विचार करण्याचा स्वहट्ट कसा चुकीचा आहे; निसर्ग, पर्यावरण, प्रदूषण, स्वच्छता, सामाजिक कर्तव्ये, इजा, अपघात याची जाणीव पाल्यांना करून देणे हे पालकांचे कर्तव्य नाही काय? काय केवळ मुलांचे निर्थक हट्ट पूरवणे एवढेच काय पालकांचे कर्तव्य? परिणामत: हट्टीपणा पुरवल्याने याची प्रचिती आपण दिवाळीत वायू प्रदूषणाच्या व ध्वनी प्रदूषणाच्या रूपात घेतच आहोत.

काहीही करून ज्यांनी फटाके फोडण्याची तयारीच ठेवलेली असेल त्यांचा आविर्भाव हा फटाक्यांमुळे इतरांसह स्वतःचाही जीव धोक्यात आहे हे जाणून घ्यायची मानसिकता नसणारे दुसऱ्याचा विचार तरी काय करणार?

ज्या भूमीवर प्रतिदिन कचऱ्याचे ढीग साचत आहेत. तेथील कचरा जाळल्यावर येणाऱ्या दुर्गंधीने अक्षरशः जीव गुदमरतो. त्यात फटाक्यांच्या कचऱ्याचा अतिरिक्त समावेश म्हणजे श्वसनाचे विकार असणाऱ्या रुग्णांच्या जखमेवर जाणीवपूर्वक मीठ चोळणे नव्हे काय? फटाक्यांचा कचरा उचलण्यासाठी स्थानिक नगरपरिषद, मनपा यांचे स्वच्छता कर्मचारी म्हणजे रस्ते स्वच्छ करणारे हक्काचे कर्मचारी म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. स्वतः कचरा करायचा आणि तो साफ करण्यासाठी दुसऱ्यांवर सक्तीने भार टाकायचा हा निर्लज्जपणाचा कळसच मनावे लागेल.

राजधानी दिल्लीसह देशाच्या विविध भागांत वायू प्रदूषण वेगाने पसरत आहे. राजधानीतील प्रदूषणाची घातक पातळी लक्षात घेता कित्येक वर्षे या काळात शाळांना सुट्टी द्यावी लागत आहे. तरीही पालथ्या घड्यावर पाणीच असे म्हणता येईल. कारण प्रदूषणाने धोक्याची पातळी गाठल्यावर तात्पुरते जागे होतात. देशाची राष्ट्रीय राजधानी दिल्ली आणि आर्थिक राजधानी मुंबई, राज्याची उपराजधानी नागपूरसह महाराष्ट्रातील अनेक शहरांवर प्रदूषणाची दाट छाया आहे. या प्रदुषणामुळे देशातील प्रमुख महानगरे आणि शहरांची विदारक स्थिती आहे. बेसुमारपणे वाढत चाललेल्या लोकसंख्येच्या अन्न पदार्थविषयक गरजा पूर्ण करण्यासाठी शेतीत रासायनिक खतांचा उपयोग होतो. त्यामुळे अन्नात कसदारपणा नाही. परिणामी माणसाची रोग प्रतिकारशक्ती कमकुवत झाल्याने अनेक आजारांनी त्याला घेरले आहे. प्रदूषित वातावरणात पिकत असलेले धान्य कसे असणार हे सुज्ञास सांगणे न लागे.

दीपावली व्यतिरिक्त निवडणूकांचे निकाल, नानाविध उत्सव, विवाहाच्या मिरवणुका , क्रिकेटचे सामने इत्यादी वेळी फटाक्यांचा धुमधडका पाहायला मिळतो. दिवाळीत फटाक्यांमुळे आग लागण्याच्या दुर्घटना होणे, भाजणे, डोळ्यांना दुखापत होणे, प्रसंगी अवयव निकामी होणे या घटनांकडे क्षुल्लक म्हणून पाहिले जात आहे. फटाक्यांमुळे कोणता वाईट प्रसंग कोणावर कधी ओढवेल हे सांगता येत नसते. कारण त्याची कटू फळे फटाक्यांशी संबंध नसलेलेच जास्त भोगतात.

फटाक्यात चारकोल, गंधक, नायट्रेट, क्लोरेट, परप्लोरेट, झच१० कण, सल्फर डायऑक्साईड, नायट्रोजन डायऑक्साईड, ओझोन, आयर्न, लेड, मँगनीज, कॉपर, बेरिलियम, निकेल हे रासायनिक घटक डोळ्यांसाठी घातक असतात. फटाके फुटल्यानंतर निघणारा धुर हा डोळे, फुप्फुस व त्वचेला अतिशय घातक अपाय करणारा असतो. दमा, हृदयविकार, ब्राँकायटिस, श्वसनाचे इतर आजारातून दमा व ॲलर्जीचे प्रमाण वाढते. फटाक्यांमुळे ध्वनी प्रदूषण व वायू प्रदुषणही मोठ्या प्रमाणात होते. फटाके फोडलेल्या ठिकाणचे तापमान प्रचंड अंशापर्यंत वाढल्याचे निष्पन्न झालेले आहे. दरवर्षी फटाक्यांमुळे घडणाऱ्या अपघातात लहान मुलांचे प्रमाण अधिक आहे. फटाक्यातून होणाऱ्या ध्वनी व वायू प्रदूषणाचा लहान मुले, गरोदर स्त्रीया, जेष्ठ नागरिक व पर्यावरणातील पशुपक्षांच्या जीवावरही घातक परिणाम होतो.

आजमितीस आपल्या हातून पर्यावरणाचा होणारा ऱ्हास काही अंशी तरी कमी करण्यासाठी हातभार लावू या.

दीपोत्सव साजरा करतांना आपल्या अंतःकरणातील मानवतेचा, बंधुत्वाचा, समतेचा, ज्ञानाचा व न्यायाचा दीप प्रथम प्रज्वलीत करू या.

"सर्वांना बळीराजा महोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!"

**होमेश भुजाडे,** नागपूर (विशाखापट्टणम, आंध्रप्रदेश वरून)

थेट मनापासून..!
दोस्तहो..!
यंदाची दिवाळी..
ज्यांच्या घरात अंधार असेल
त्यांच्या घरापर्यंत जावी
ज्यांच्या मनात अंधार असेल
त्यांच्या मनापर्यंत जावी
अंधारालाही
प्रकाशाची फुलं यावी !
तुम्ही
आम्ही
सारेच.. मनापासून
तसे प्रयत्न करूया..!
नुसत्याच
वरवर शुभेच्छा देण्याची
नाटकं आता नकोत !

**ज्ञानेश वाकुडकर**
नागपूर





























